महापार ही प्रणाली दि.३.७.२०१७ पासून प्रत्यक्ष कामकाजासाठी उपलब्ध करुन देणेबाबत आणि कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी सुधारित वेळापत्रक.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीएफआर-१२१७/ प्र.क्र.३७/का.१३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u> : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : सीएफआर-१२११/ प्र.क्र.२५७/का.१३ दि.२.२.२०१७

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीएफआर-१२११/ प्र.क्र.२५७/का.१३ दि.२९.६.२०१७.

शासन परिपत्रक :-

गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१६-१७ चे कार्यमूल्यमापन MahaPAR ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये नोंदविणे अपेक्षित आहेत त्या अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालासाठी सुधारित वेळापत्रक वरील वाचा क्र.१ येथील परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आले होते. तथापि MahaPAR ही प्रणाली लागू करण्याचे हे पहिलेच वर्ष असल्याने व सदर प्रणाली प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यास काही प्रमाणात झालेला विलंब विचारात घेवून संदर्भ क्र.२ येथील दिनांक २९.६.२०१७ च्या परिपत्रकामध्ये विहित केलेल्या वेळापत्रकामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

जबाबदार अधिकारी	**कार्यवाहीचे स्वरुप**	**कार्यवाहीचा कालावधी**
संबंधित अधिकारी	स्वयंमूल्यनिर्धारण	३० सप्टेंबर,२०१७ पर्यंत
प्रतिवेदन अधिकारी	प्रतिवेदन अधिका-यांचे मूल्यमापन	१४ ऑक्टोबर,२०१७ पर्यंत
पुनर्विलोकन अधिकारी	पुनर्विलोकन अधिका-यांचे मूल्यमापन	३० ऑक्टोबर ,२०१७पर्यंत
अतिरिक्त परिक्षक	संबंधित अधिकाऱ्यांस प्रत उपलब्ध करुन देणे.	५ नोव्हेंबर,२०१७ पर्यंत

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१७०९१६१५४१२३८६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sunil R Joshi

Digitally signed by Sunil R Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=ed693ebe82bd686692d892835315578f33ccb3e0629da8fc85869c852933fb68, cn=Sunil R Joshi
Date: 2017.09.16 15:32:24 +05'30'

(सु. रा. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा. राज्यपाल यांचे सचिव
२.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / सचिव
३.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
४.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
५.सह सचिव/ उप सचिव (गृह विभाग, महसूल विभाग, वित्त विभाग, ग्राम विकास विभाग, सहकार विभाग, नगर विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
६.सर्व मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना शाखा.
७. उप सचिव (का.१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
८.निवडनस्ती / कार्यासन-१३.

****